**<u>ठळक बातम्या</u>**

- इंडोनेशिया दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं जकार्तामध्ये जल्लोषात स्वागत

- देशात लवकरच सहकारी आयुर्विमा कंपनी स्थापन करण्याचे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचे संकेत

- राज्याच्या अनेक भागात पावसानं जनजीवन विस्कळीत, शून्य बळींचं उद्दिष्ट ठेवून काम करण्याचे मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला आदेश

- महाराष्ट्र आणि ओडिशामधल्या लाडकी बहीण सारख्या योजनांच्या प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेकडून कौतुक

**आणि**

- पारदर्शी कारभारासाठी विशेष तज्ज्ञांची बैठक घेण्याचा अयोध्येतल्या राम मंदीर ट्रस्टचा निर्णय

**<><><><><>**

तीन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज इंडोनेशियात जकार्ता इथं पोहोचले. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रोबोवो सुबियांतो यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. मोदी यांच्या स्वागतार्थ इंडोनेशियातल्या स्थानिक आणि भारतीय वंशाच्या समुदायानं पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता.

प्रधानमंत्री मोदी चौथ्यांदा इंडोनेशियात गेले असून ते द्विपक्षीय चर्चा करतील तसंच परस्पर सहकार्याचा आढावा घेतील. ऐतिहासिक वारसा शहर योग्यकर्ता इथल्या प्रबानन मंदिर संकुलाला ते भेट देतील. या संकुलात भारत इंडोनेशिया

सहकार्यातून ऐतिहासिक वारसा जतनाचं काम सुरु आहे. प्रधानमंत्री नंतर तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधतील.

**<><><><><>**

डॉक्टर श्यामा प्रसाद मुखर्जी हे एक थोर देशभक्त तसंच देशाच्या अखंडतेसाठी झटणारे समर्पित द्रष्टे व्यक्तिमत्व होते असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या एका व्हिडीओ संदेशात म्हटलं आहे. हा संदेश डॉक्टर मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त पाठवला असून त्यात त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे.

**होल्ड - प्रधानमंत्री**

डॉक्टर मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त सरकार दोन वर्ष राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरी करत आहे. गेल्यावर्षी ६ जुलैपासून सुरु झालेला हा उत्सव पुढच्या वर्षाच्या ६ जुलैपर्यंत सुरु राहणार असल्याची माहिती मोदींनी या संदेशाद्वारे दिली आहे.

**<><><><><>**

देशात भारत टॅक्सीच्या धर्तीवर सहकारी संस्थांच्या विकासाला चालना देण्यासाठी एक सहकारी आयुर्विमा कंपनी स्थापन केली जाईल अशी घोषणा केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी केली. सहकार मंत्रालयाच्या पाचव्या स्थापना दिनानिमित्ताने आज त्यांच्या हस्ते देशभरातल्या अनेक महत्त्वाच्या सहकार उपक्रमांची पायाभरणी आणि उद्घाटन झालं त्यावेळी ते बोलत होते. गेल्या काही काळात सहकारी संस्थांचा विस्तार अनेक क्षेत्रांत झाला आहे आणि त्या केवळ दुग्ध, साखर आणि खत व्यवसायापुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. बियाणांसाठी स्थापन झालेली सहकारी कंपनी येत्या ३ वर्षात पहिल्या क्रमांकावर पोहोचेल असंही ते म्हणाले.

**होल्ड - अमित शहा**

**<><><><><>**

मुंबईसह राज्यात ठिकठिकाणी पावसाने जोरदार हजेरी लावली. मुसळधार पावसामुळं आज मुंबईत विधीमंडळाचं कामकाज अवघ्या काही मिनिटात तहकूब करण्यात आलं. आज दिवसभरात पुण्यात ३ जणांचा मृत्यू झाला. गेल्या २ दिवसात पावसामुळं विविध दुर्घटनांमध्ये १३ जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाल्याची माहिती राज्याच्या आपत्ती निवारण कक्षानं दिली आहे. पालघर, रायगड, पुणे तसंच नाशिक घाटमाथा या भागांना उद्यासाठी मुसळधार पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सातारा घाट परिसर, नाशिक या भागांना उद्यासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**<><><><><>**

राज्यभरात मुसळधार पावसाच्या शक्यतेसह येत्या तीन दिवसांत हवामानाची तीव्रता कायम राहण्याचा अंदाज आहे.  त्यामुळं सर्व शासकीय यंत्रणा २४ तास अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. राज्य आपत्ती नियंत्रण कक्षात आयोजित बैठकीत ते बोलत होते.  पुढील ४८ तास ‘शून्य बळी’ हे उद्दिष्ट ठेवून कमाल दक्षता बाळगावी. तसंच आज आणि उद्या अत्यावश्यक काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

खाजगी आस्थापनांनी  मानवतेच्या दृष्टिकोनातून कर्मचाऱ्यांना वर फ्रॉम होमची सवलत द्यावी. असे न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरही मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात माती व दगड रस्त्यावर आले आहेत. संबंधित यंत्रणा मार्ग मोकळा करून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम कराव, अशा सूचनाही मुख्यमंत्री

फडणवीस यांनी दिल्या. मुंबई-गोवा, मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील अडथळे तात्काळ दूर करून वाहतूक सुरळीत करावी. कुठल्याही परिस्थितीत वाहतुकीचे कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

आषाढी वारीसाठी श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचं उद्या देहुतून तर श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचं बुधवारी आळंदीतून प्रस्थान नियोजित आहेत. मात्र इंद्रायणी नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला असून आळंदी शहरात प्रवेश करणारे नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे सध्या आळंदी शहरात येणे सुरक्षित नाही. ज्या वारकरी व भाविकांनी आळंदीच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे, त्यांनी ज्या ठिकाणी आहात, त्या ठिकाणीच सुरक्षित थांबावे. देहू व आळंदी येथे न जाता पुणे शहरात वारीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केलं आहे. दरम्यान, ११ वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना ८ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**<><><><><>**

लाडकी बहीण सारख्या विविध राज्यांनी लागू केलेल्या योजनांचा वेळोवेळी आढावा घ्यावा. वाढती महागाई आणि कुटुंबातल्या खर्चांचं बदलत असलेलं प्रमाण या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेनं ही शिफारस केली आहे. महाराष्ट्र आणि ओडिशामधल्या अशा योजनांचा अभ्यास करणारा अहवाल परिषदेनं आज प्रसिद्ध केला. या योजनांमुळं लाभार्थ्यांच्या बचत आणि खर्चाच्या सवयीत सुधारणा झाल्याचं निरीक्षण या अहवालात नोंदवलं आहे. या योजनेतून मिळणाऱ्या पैशांमुळं महिलांच्या बचत खात्यात महिना अखेर असणारी रक्कम महाराष्ट्रात ८४ टक्क्यांनी तर ओडिशात ४५ टक्क्यांनी वाढली. तर या लाभार्थ्यांच्या मासिक खर्चात महाराष्ट्रात ४६ टक्के आणि ओडिशात २८ टक्के

वाढ झाल्याचं या अहवालात म्हटलं आहे. या लाभार्थ्यांचा आरोग्य, शिक्षण, सौंदर्यप्रसाधने, वैद्यकीय उपचार यावरचा खर्च वाढल्याचं यात नमूद आहे.

**<><><><><>**

अयोध्येतल्या राम जन्मभूमी ट्रस्टने कारभार आदर्श, कुशल आणि पारदर्शी करण्यासाठी विशेष तज्ज्ञांची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय देणगी अपहार प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीच्या शिफारसीही विचारात घेतल्या जाणार आहेत. देणगी अपहार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ट्रस्टची बैठक आज अयोध्येत झाली. त्यात सरचिटणीस चंपत राय आणि सदस्य अनिल मिश्रा यांचे राजीनामे स्वीकारले आहेत. ट्रस्टचे खजिनदार गोविंद गिरी यांनी ही माहिती दिली. कृष्ण मोहन यांच्याकडे तूर्त सरचिटणीसपदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. गोपाळ नगरकोटे यांना विशेष निमंत्रित सदस्य पदावरुन हटवण्याचा निर्णयही ट्रस्टनं घेतला. आतापर्यंत भाविकांकडून ट्रस्टला २ हजार ९२६ भेट वस्तू मिळाल्या असून त्यांची नोंद करण्यात आलेली आहे. तसंच त्यांची भौतिक पडताळणी त्रयस्थ लेखापालांकडून दरवर्षी केली जाते. याची सत्यता पडताळण्यासाठी भाविक कधीही येऊ शकतं असंही ट्रस्टनं प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

रशियाने आज युक्रेनची राजधानी कीव्हवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनने हल्ले केले, त्यात किमान १८ जणांचा मृत्यू झाला, तर सुमारे ६० जण जखमी झाले. गेल्या गुरुवारी रशियाने केलेल्या हल्ल्यात कीव्ह मधे ३१ जण मरण पावले. युक्रेनने अलिकडेच रशियातल्या इंधन साठ्यावर केलेल्या हल्ल्यांचं हे प्रत्युत्तर असल्याचा दावा रशियन संरक्षण मंत्रालयाने केला आहे. या हल्ल्यांमुळे युक्रेनची संरक्षण यंत्रणा कमकुवत असल्याचं उघड झालं आहे.

**//<><><><><>//**